<u>नि.दि.मु.क्र.५०/२०१२ मधील नि.२२२ खालील आदेश</u>

**CNR.NO.MHST**160002532012

(अशोक बुवासाो नायकवडी वगैरे वि. भागुबाई मारुती नायकवडी वगैरे)

सदरचा अर्ज वादी क्र.३ ने जादा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र देणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. **वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की,**

सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप झालेले आहे ते जाहीर होवून मिळण्याकरिता तसेच दिनांक २९.३.२००४, २५.५.२००४, व ११.७.२००३ च्या कराराप्रमाणे खरेदीपत्र करुन मिळण्याकरिता केलेला आहे. वादी क्र.१ ची साक्ष झालेली आहे. त्याचा उलटतपासही झालेला आहे. प्रतिवादी क्र.६ ने प्रतिवादी क्र.७ व ८ यांना दावा मिळकत नंबर १० चे खरेदीपत्र करुन दिल्याने त्यांना प्रतिवादी म्हणून सामील केलेले आहे. त्या अनुषंगाने वादी क्र.१ चे जादा पुराव्याचे शपथपत्र निशाणी २०४ वर दाखल केलेले आहे. परंतू, वादी क्र.१ यास उच्च रक्तदाब व मधुमेहाचा त्रास आहे. तसेच त्याचे प्रोटेस्ट ग्रंथीची शस्त्रक्रिया झालेली आहे. त्याची मानसिक कमजोरी आहे. त्याला नीट समजत नाही व त्याचा स्मृतीभ्रंश झाला आहे, त्यामूळे दिनांक ६.४.२०२४ रोजी वादीने डॉक्टरांच्या प्रमाणपत्रासह मुदतीचा अर्ज दिला होता. परंतू, आता वादी क्र.१ हा उलटतपासाकरिता हजर राहू शकत नाही. त्यामूळे वादी क्र.३ चे जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे झालेले आहे. वादी क्र.१ चे जादा पुराव्याचे प्रतिज्ञापत्र तसेच ठेवून वादी क्र.३ चे जादा पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामधे कसलाही फेरबदल न करता पुराव्याचे शपथपत्र देण्याची परवानगी मिळावी.

३. प्रतिवादीने निशाणी २२४ वर सदरच्या अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. वादी क्र.१ ला शरिरिक त्रास असल्याबाबत कोणताही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. अनेकदा मुदती देवूनही वादी क्र.१ उलटतपासाकरिता हजर नसल्याने न्यायालयाने वादीचा अर्ज रद्द केलेला आहे. वादीने केलेली विनंती नामंजूर होण्यास पात्र आहे, त्यामूळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा .

४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी क्र.१ हा सतत आजारी असल्याने व त्याचा स्मृतीभ्रंश झाल्याने तो उलटतपासाकरिता हजर राहू शकत नाही, त्यामूळे त्याचा पुरावा तसाच ठेवून वादी क्र.३ ला जादा पुरावा

देण्याची परवानगी देण्यात यावी. प्रतिवादीच्या वकीलांना असा युक्तीवाद केला की वादी क्र.१ चा पुर्ण उलटतपास झाल्याशिवाय वादी क्र.३ चा जादा पुरावा वादींना देता येणार नाही. त्यामूळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा .

**५.** सर्व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दिनांक १७.१.२०२३ रोजी जादा मुद्दे काढण्यात आले. वादींनी निशाणी २११ सोबत वादी क्र.१ चे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरच्या वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये त्याला स्मृतीभ्रंशचा आजार असल्याचे नमूद केले आहे. निशाणी ६३ वर वादी क्र.१ ची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यानंतर, वादीतर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आले. तसेच प्रतिवादींचे देखील साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. परंतू, दाव्यामध्ये व लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती झाल्यामूळे अतिरक्त मुद्दे काढण्यात आले व त्या अनुषंगाने दावा पुन्हा वादीच्या पुराव्याकरिता नेमण्यात आलेला आहे. वादीने मागितलेल्या विनंतीप्रमाणे वादी क्र.१ चा पूर्वीचा झालेला पुरावा तसाच ठेवून पुन्हा वादी क्र.३ चा पुरावा देण्याबाबतची तरतूद दिवाणी प्रक्रिया संहितामध्ये नाही. वादींना वादी क्र.३ चा पुरावा घेता येईल. परंतू, वादी क्र.१ चा झालेला पुरावा तसाच ठेवून वादी क्र.३ चा पुरावा घेता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

**१.** सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ठिकाण – वाई. (सी. व्ही. शिरसाट)

दिनांक – १३.०३.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.